# १६ लाखाचे बक्षिस असलेल्या जहाल नक्षलवादयाला अटक

महाराष्ट्र- ओरिसा- छत्तीसगड राज्यामध्ये नक्षल दलममध्ये कार्यरत असलेला जहाल नक्षल डिव्हीसी सदस्य पवन ऊर्फ सोमा फोदा वेलादी, वय- ३५ वर्षे, रा. परसेगुंडी, फरसेगड, ता. भोपालपट्टनम जि.बिलापुर (छ. ग) यास गडचिरोली पोलिसांनी अभियान राबवून अटक केली. अटक करण्यात आलेला नक्षल हा गरीयाबंद डिव्हीजनल कमेटी सदस्य असून त्याने यापुर्वी गडचिरोली जिल्हयातील प्लाटून नं. ३, मिलीटरी दलम बिजापुर  सांड्रा दलम नंबर २२ मध्ये काम केले असून वरीष्ठ  नक्षल नेत्यांचा  अंगरक्षक म्हणून ही कार्य केले आहे. गेल्या दोन दशकात विविध हिंसक घटना, पोलीस व सामान्य नागरिकांच्या हत्या,  भुसूरुंग स्फोट यामध्ये त्याच्या समावेश आहे. डिव्हीसी पवन याचेवर १६ लाख रूपयाचे रोख पारितोषीक आहे. गडचिरोली व बिजापुर सिमेवरील कार्यरत सांड्रा दलममधील ०३ नक्षल सदस्यांना एप्रिल महिन्यात नक्षल अभियाना दरम्यान गडचिरोली पोलीसांनी अटक केली होती. त्यानंतर याच परीसरात नक्षल विरोधी अभियान राबवून डिव्हीजनल कमिटी सरस्य डिव्हीसी पवन ऊर्फ सोमा फोदा वेलादी याला अटक करण्यात  आल्याने नक्षलवादयांना मोठा हादरा बसला असून गडचिरोली पोीलसांचे मोठे यश मानले जात आहे.